MHAH190011952013

# नियमित दिवाणी दावा ३८३ /२०१३ नि. २२ वरील आदेश

( भिकाजी फुंदे वि. काशीबाई फुंदे )

वादी तर्फे प्रस्तूतचा अर्ज उपअधिक्षक, भुमिअभिलेख कार्यालय शेवगाव यांची फेर कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक होणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे,

सदर दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदीसाठी व मोजणीसाठी दाखल केलेला आहे. वादीचे कथन की, सदर दाव्यामध्ये मे. कोर्टाने नि ०५ वर वादी व प्रतिवादी यांचा मौजे मळेगाव येथील गट नं. ८२,८३ व ८४ ची मोजणी होणेकामी आदेश पारित केला व त्याप्रमाणे भुमिअभिलेख कार्यालय शेवगाव यांनी आदेशाचे पालन न करता गट नं. ८२, ८३ व ८४ ची मोघम स्वरुपात मो र नं. ३००/२०१५ अन्वये दि. १३.०३..२०१५ रोजी मोजणी केली व त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांची नावे टाकुन क्षेत्र मोघम स्वरुपात मोजली व केवळ नकाशामध्ये प्रतिवादीने वादीच्या गट नं. ८४ च्या पूर्व व दक्षिण बाजुने अतिक्रमण केलेले असतानाही सदरचा अतिक्रमणीत भाग रंगाने न दर्शविता केवळ बांधपड असा उल्लेख करुन अतिक्रमणीत भाग मुद्दामहून प्रतिवादीच्या सांगण्यावरुन दाखविलेला नाही. त्यामुळे मोजणी नकाशाप्रमाणे वादी यांना त्यांचे अतिक्रमणीत भागाचा कब्जा मिळणेसाठी सदर दाव्यामध्ये दुरुस्ती करणे शक्य नाही. त्यामुळे वादीने पुन्हा त्याच फि मध्ये मा. उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालय शेवगाव ता. शेवगाव यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदरच्या अर्जावर प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दिले. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वादीने दाव्याचे कामकाज लांबणीवर पाडण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादींनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

४. वादीचा अर्ज, व वादीचे वकिल यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रतिवादींच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. त्याचप्रमाणे वादीने यापुर्वी दाखल केलेल्यानि ०५ वरील अर्जाचे व कोर्ट आदेशाचे अवलोकन केले. त्यामध्ये असे दिसून येते की, कोर्टाने मिळकतीमध्ये अतिक्रमण असल्यास ते अहवालामध्ये स्पष्टपणे नमुद करण्याचे आदेशित केले होते. त्याचप्रमाणे मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता वादीची कथने ही सत्य असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच मोजणीदार यांनी कोर्ट आदेशाप्रमाणे मोजणी केली नसल्याचे येथे स्पष्ट होते. परंतु मोजणीदार यांच्याकडून राहून गेलेल्या बाबींमुळे पक्षकाराचे नुकसान होणे हे न्यायाच्या दृष्टीने योग्य व उचित नाही. त्याचप्रमाणे कोर्ट आदेश, मोजणी नकाशा, आयुक्त अहवाल याचे एकत्रित अवलोकन केले असता यामध्ये काही बाबी राहून गेल्याचे दिसून येते. सदरचा दावा स्थावर व जंगम मालमत्ते बाबतचा असून त्यामध्ये दोन्ही पक्षांचे हितसंबंध

गुंतलेले आहेत. तसेच दाव्याचा योग्य तो निकाल लागण्याकरिता सदरचा अहवालामुळे न्यायालयास मदतच होणार आहे. अशा परिस्थीतीत जर वादीचा अर्ज फेटाळला तर वादीचे अपरिमीत असे नुकसान होवून शकते. सदरील दाव्याचा योग्य तो निकाल हा दावा मिळकतीची मोजणी केल्यानंतरच गुण दोषांवर देता येवू शकतो. तसेच सदरील दावा हा स्थावर मालमत्ते बाबतचा असून त्यामध्ये दोन्ही पक्षांचे हितसंबंध गुंतलेले आहेत त्यामुळे योग्य तो न्याय होण्यासाठी आणि दाव्यातील गुंतागुंत कमी करण्यासाठी व न्यायाच्या दृष्टीने सदरील अर्ज मंजूर होणे गरजेचे आहे. तसेच वादीने यापूर्वीच सदरच्या मोजणी प्रकरणाची फि भरलेली असून मोजणीदार यांच्या चुकीची शिक्षा वादीस होणे हे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. त्यामुळे पुर्वीच्याच फि वरती सदरचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. तालूका निरिक्षक भुमि अभिलेख, शेवगाव यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन फेर नेमणुक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी गट नं.८२, ८३ आणि ८४ ची मोजणी करून हद्दीखुणा निश्चित करुन दयाव्यात. तसेच तालुका उपअधिक्षक यांना असे आदेशीत करण्यात येते की, अतिक्रमण असल्यास मोजणी अहवालामध्ये नकाशासह अतिक्रमण भागाचा स्पष्ट उल्लेख वेगवेगळया रंगामध्ये नमुद करून ते अतिक्रमीत क्षेत्र कोणाच्या ताब्यात आहे यांचा उल्लेख करावा व अतिक्रमण नसल्यास देखिल तसा स्पष्ट उल्लेख नकाशामध्ये करावा. कोर्ट कमीशनर यांनी फेर मोजणी करुन हद्दीखुणा बाबत व अतिक्रमणा बाबतचा नकाशा व अहवाल कोर्टात एक महिन्याच्या आत सादर करावा.

४. वादीने न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मोजणीसाठीचा योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करावी.

५. कोर्ट कमीशनर यांनी दोन्ही पक्षांना अगाउ नोटीस देवून मोजणीचे काम पूर्ण करावे.

६. मोजणी अंती अतिक्रमण दिसून आले तर ते रंगीत करून नकाशात व अहवालात स्पष्टपणे नमुद करावे.

७. योग्य त्या पुर्ततेनंतर सदरील आदेशाची रिट पाठविण्यात यावी.

VRUSHALI BABURAO DOMBE

Digitally signed by VRUSHALI BABURAO DOMBE
Date: 2024.07.22 17:17:38 +0530

(व्ही.बी.डोंबे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
शेवगाव.

दि. ०८/०७/२०२४